## MAHARASHTRA ACT No. V OF 1967

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १५ एप्रिल १९६७ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. V OF 1967

### AN ACT TO REMOVE DOUBTS AS TO THE VALIDITY OF CERTAIN CHANGES MADE IN THE AREAS COMPRISING THE LIMITS OF CERTAIN LOCAL AUTHORITIES AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH.

## सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात" दिनांक १७ एप्रिल १९६७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**विवक्षित स्थानिक प्राधिकारी संस्थांच्या सीमांचा अंतर्भाव असलेल्या क्षेत्रांमध्ये केलेल्या विवक्षित बदलांच्या वैधतेसंबंधीच्या शंका दूर करण्यासाठी व तत्संबंधित बाबींसाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, विवक्षित नगरपालिकांना लागू असलेल्या संबंधित नगरपालिका विधींच्या उपबंधांनुसार त्या नगरपालिकांच्या सीमांमध्ये काही क्षेत्रांची भर घालण्यात आली असून त्यांचा त्या सीमांमध्ये समावेश करण्यात आला आहे, परंतु त्याच वेळी अशा क्षेत्रांचा संबंध यथास्थिति, ज्या संबंधित जिल्हा स्थानिक मंडळाशी, जिल्हा परिषदेशी, पंचायत समितीशी किंवा ग्रामपंचायतीशी होता, अशा जिल्हा स्थानिक मंडळाच्या, जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या किंवा यथास्थिति ग्राम-पंचायतीच्या सीमांमधून अशी क्षेत्रे, अशा स्थानिक प्राधिकारी संस्थांशी संबंधित असलेल्या संबंधित विधीत तत्संबंधी तरतूद केलेल्या रीतीने, योग्य रीत्या वगळण्यात आलेली नाहीत ;

आणि ज्याअर्थी, संबंधित स्थानिक प्राधिकारी संस्थांच्या सीमांमध्ये योग्य रीत्या बदल न करता विवक्षित क्षेत्रे नगरपालिकेच्या सीमांमध्ये त्याचप्रमाणे समाविष्ट करून पुन्हा वगळण्यात आली आहेत.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त नगरपालिकांच्या सीमांमध्ये ह्या क्षेत्रांचा करण्यात आलेला समावेश किंवा अपवर्जन यांच्या वैधतेबद्दल शंका निर्माण झाल्या आहेत ; आणि त्याचाच परिणाम म्हणून उपरोक्त रीत्या परिवर्धन केलेल्या किंवा परिवर्धन केल्याचे अभिप्रेत असलेल्या किंवा कमी करण्यात आलेल्या किंवा कमी केल्याचे अभिप्रेत असलेल्या नगरपालिका सीमांमध्ये कार्य करणाऱ्या नगरपालिकांच्या व तसेच जी क्षेत्रे तदनुसार कमी केल्याचे किंवा परिवर्धित केल्याचे अभिप्रेत असेल त्या क्षेत्रांमध्ये कार्य करणारी जिल्हा स्थानिक मंडळे, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या योग्य रचनेसंबंधीही शंका निर्माण झाल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, ह्या शंका दूर करणे आणि उपरोल्लिखित प्रयोजनांसाठी केलेली सर्व कारवाई वैध ठरविणे, आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे, भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव आणि प्रारंभ. १. (१) ह्या अधिनियमास महाराष्ट्र नगरपालिका सीमांचा विस्तार (वैधकरण) अधिनियम, १९६७, असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक १२ जानेवारी १९६७ रोजी अमलात आल्याचे समजण्यात येईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "जिल्हा स्थानिक मंडळ" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले जिल्हा स्थानिक मंडळ ;

(ब) "नगरपालिका विधी" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला, संबंधित वेळी अमलात असलेला, नगरपालिका अधिनियम;

(क) "नगरपालिका" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले नगरपालिका प्राधिकरण ;

(ड) "पंचायत समिती" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पंचायत समिती ;

(ई) "अनुसूची" म्हणजे या अधिनियमाची अनुसूची ;

(फ) "ग्रामपंचायत" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली ग्रामपंचायत ;

(ग) "जिल्हा परिषद" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली जिल्हा परिषद.

नगरपालिका सीमांमध्ये करण्यात आलेला विवक्षित क्षेत्रांचा अंतर्भाव ३. (१) दिनांक १ मे १९६२ च्या लगतपूर्वी अमलात असलेल्या मुंबई स्थानिक मंडळे अधिनियम, १९२३, यामध्ये किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये, किंवा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यामध्ये, किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही विधी यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही नगरपालिकेच्या समोर त्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये दिलेल्या (संबंधित नगरपालिका विधी अन्वये काढण्यात आलेल्या) शासकीय अधिसूचनेच्या अनुसार, अशा नगरपालिकेच्या सीमांमध्ये कोणत्याही क्षेत्राची घालण्यात आलेली भर किंवा करण्यात आलेला अंतर्भाव किंवा कोणत्याही

32

क्षेत्राचे अपवर्जन हे अधिसूचनेच्या आशयाप्रमाणे, सर्व प्रयोजनांसाठी, नगरपालिकेच्या सीमांमध्ये योग्य व वैधरीत्या घातलेली भर किंवा केलेला अंतर्भाव किंवा केलेले अपवर्जन असल्याचे मानण्यात येईल ; आणि उक्त क्षेत्र हे अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये, स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या समोर दिलेल्या सीमांमधून संबंधित वेळी योग्य रीत्या वगळण्यात आल्याचे किंवा समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

किंवा अपवर्जन यांचे वैधकरण आणि संबंधित प्राधिकारी संस्थांची पुनर्रचना.

(२) आणि त्यानुसार, नगरपालिका, जिल्हा स्थानिक मंडळ, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा यथास्थिति, उपरोल्लिखित ग्रामपंचायत ही, सर्व प्रयोजनांकरिता तिच्या सीमांमध्ये, परिवर्तित केलेल्या किंवा यथास्थिति कमी केलेल्या क्षेत्रांच्या संबंधात योग्य रीतीने आणि वैध रीतीने प्रस्थापित किंवा पुन:स्थापित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ; आणि राज्य शासन किंवा नगरपालिका, जिल्हा स्थानिक मंडळ, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत किंवा कोणीही किंवा त्यांचा अधिकारी किंवा कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने, त्यांना लागू असलेल्या संबंधित विधी अन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कारवाई ही वैध रीत्या केलेली किंवा करण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल ; आणि अशा रीतीने केलेल्या किंवा करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीस किंवा कारवाईस, कोणतेही क्षेत्र हे नगरपालिकेच्या सीमांमध्ये वैध रीत्या जादा दाखल करण्यात आले नव्हते किंवा समाविष्ट करण्यात आले नव्हते किंवा त्यातून वगळण्यात आले नव्हते, किंवा ते त्यानुसार, जिल्हा स्थानिक मंडळ, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत यांच्या सीमांमधून योग्य रीत्या वगळण्यात आले नव्हते किंवा त्यामध्ये समाविष्ट करण्यात आले नव्हते, याच केवळ कारणावरून किंवा अशाच कारणापासून उद्‌भवणाऱ्या किंवा त्याच्या परिणामस्वरूप असेल अशा कोणत्याही कारणावरून, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे हरकत घेता कामा नये.

४. महाराष्ट्र नगरपालिका सीमांचा विस्तार (वैधकरण) अध्यादेश, १९६७, हा, याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

सन १९६७चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ रद्द करणे.

// अनुसूची

| अनुक्रमांक | नगरपालिकेचे नाव | ज्या अन्वये नगरपालिकेच्या सीमा वाढविण्यात किंवा कमी करण्यात आल्या तो अधिनियम | जी अन्वये (नगरपालिका) सीमा वाढविण्यात किंवा कमी करण्यात आल्या ती शासकीय अधिसूचना | संबंधित जिल्हा स्थानिक मंडळाचे, जिल्हा परिषदेचे, पंचायत समितीचे आणि ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अहमदनगर बरो नगरपालिका. | मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २७ एप्रिलची १९६२ची अधिसूचना क्रमांक एम्बीआर् १२५९-ए. | अहमदनगर जिल्हा स्थानिक मंडळ, अहमदनगर जिल्हा परिषद, अहमदनगर पंचायत समिती व सावेडी ग्रामपंचायत. |
| २ | श्रीरामपूर नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २७ एप्रिल १९६४ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम् १२६१/५४२३७-ए. | अहमदनगर जिल्हा परिषद, श्रीरामपूर पंचायत समिती आणि शिरसगाव ग्रामपंचायत. |
| ३ | जळगाव बरो नगरपालिका .. | मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक ९ मे १९६३ ची अधिसूचना क्रमांक एम्बीआर्-१२६१-ए. | जळगाव जिल्हा परिषद, जळगाव पंचायत समिती आणि पिंपराळा ग्रामपंचायत. |
| ४ | पाचोरा नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक ६ मे १९६५ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम् १२६३/२५१७२-ए. | जळगाव जिल्हा परिषद आणि पाचोरा पंचायत समिती. |
| ५ | सावदे नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक ८ मे १९६५ची अधिसूचना क्रमांक डीटीएम् १२६३/२५/७०-ए. | जळगाव जिल्हा परिषद आणि रावेर पंचायत समिती. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | एरंडोल नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक १८ जून १९६५ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६३/२६५४५-ए. | जळगाव जिल्हा परिषद आणि एरंडोल पंचायत समिती. |
| ७ | पनवेल नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २५ मे १९६४ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६०/१७९९१-ए. | कुलाबा जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती. |
| ८ | मालेगाव बरो नगरपालिका .. | मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक ३ ऑक्टोबर १९६३ ची अधिसूचना क्रमांक एम्बीआर्-१२६२/४१०९३-ए. | नाशिक जिल्हा परिषद आणि मालेगाव पंचायत समिती. |
| ९ | वाई नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २६ ऑक्टोबर १९६४ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६०-ए. | सातारा जिल्हा परिषद व वाई पंचायत समिती. |
| १० | मैंदर्गी नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २१ सप्टेंबर १९६४ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६३/४३७५९-ए. | सोलापूर जिल्हा परिषद व अक्कलकोट पंचायत समिती. |
| ११ | कुर्डुवाडी नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३). | (अ) नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक १७ मार्च १९६२ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६१-ए.<br>(ब) नगरपालिका व आरोग्य विभागाची दिनांक २६ नोव्हेंबर १९६४ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६१-ए. | जिल्हा स्थानिक मंडळ, सोलापूर, सोलापूर जिल्हा परिषद, माढा पंचायत समिती व कुर्डु ग्रामपंचायत. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | नगरपालिकेचे नाव | ज्या अन्वये नगरपालिकेच्या सीमा वाढविण्यात किंवा कमी करण्यात आल्या तो अधिनियम | जी अन्वये (नगरपालिका) सीमा वाढविण्यात किंवा कमी करण्यात आल्या ती शासकीय अधिसूचना | संबंधित जिल्हा स्थानिक मंडळाचे, जिल्हा परिषदेचे, पंचायत समितीचे आणि ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १२ | अंबरनाथ नगरपालिका .. | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ च मुंबई अधिनियम क्रमांक ३). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २५ मे १९६३ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-१२६२-ए. | ठाणे जिल्हा परिषद, कल्याण पंचायत समिती व अंबरनाथ पाले ग्रामपंचायत. |
| १३ | नळदुर्ग नगर समिती .. | हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १८). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २३ डिसेंबर १९६३ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-(एच्)-१२६२/५०५९२-ए. | उस्मानाबाद जिल्हा परिषद व तुळजापूर पंचायत समिती. |
| १४ | तुमसर नगरपालिका समिती .. | मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ (सन १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक ३ जुलै १९६५ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-(एम्)-१२६३/३००९०-एन्. | भंडारा जिल्हा परिषद व तुमसर पंचायत समिती. |
| १५ | मेहकर नगरपालिका समिती .. | मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ (सन १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक १५ एप्रिल १९६५ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-(एम्) १२६३/१४६७६-एन्. | बुलढाणा जिल्हा परिषद व मेहकर पंचायत समिती. |
| १६ | खापा नगरपालिका समिती .. | मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ (सन १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक १९ सप्टेंबर १९६४ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-(एम्) १२६२/४५३९९-एन्. | नागपूर जिल्हा परिषद, सावनेर पंचायत समिती व गुमगाव ग्रामपंचायत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | पुसद नगरपालिका समिती .. | मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ (सन १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक २१ जून १९६३ ची अधिसूचना क्रमांक डीटीएम्-(एम्)-१२६२/२३३५७-ए. | यवतमाळ जिल्हा परिषद व पुसद पंचायत समिती. |
| १८ | दिग्रस नगरपालिका समिती .. | मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ (सन १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २). | नगरविकास व आरोग्य विभागाची दिनांक ११ ऑक्टोबर १९६५ ची अधिसूचना क्रमांक एम्यूएन्-(एम्)-१२६५/३१६२३-एन्. | यवतमाळ जिल्हा परिषद व दिग्रस पंचायत समिती. |

(यथार्थ अनुवाद)
बा. ना. पंडित,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.